पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,
पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३
dcptfc-pcpc@mah.gov.in



जा.क्र./पोउआ/वाह/सं.रॅली/598977//२०२६ पिंपरी चिंचवड दिनांक - 25/११/२०२६

☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

दिनांक २६/११/२०२६ रोजी संविधान दिना निमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे वतीने लहुजी वस्ताद साळवे स्मारक चौक चिंचवड स्टेशन ते भीमसृष्टी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक पिंपरी अशी सर्विस रोडने 'संविधान सन्मान दौड' रॅलीचे आयोजन केले आहे. सदर रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणात जनसमुदाय सहभागी होणार आहे. त्यामुळे नमुद मार्गावर वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर रॅली मार्गाकडे येणारी वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विक्रांत देशमुख, पोलीस उपायुक्त, वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करीत आहे.

पिंपरी वाहतूक विभाग

दिनांक व वेळ	बंद करण्यात येणारा मार्ग	पर्यायी मार्ग
२६/११/२०२६ रोजी पहाटे ०४/०० ते सकाळी १०/०० वा. पर्यंत	१. ॲटो क्लस्टर ते हनुमान मंदीर चौक जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना मनाई करण्यात येत आहे	ॲटो क्लस्टर→मदरतेरेसा पुल → काळेवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.
	२. सम्राट चौक ते मोरवाडी चौक जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना मनाई करण्यात येत आहे.	१.सम्राट चौक युटर्न जुन्या कोर्ट मार्गे इच्छित स्थळी जातील. २.अजमेरा मार्गे इच्छित स्थळी जातील.
	३.नेहरुनगर कडुन पिंपरी चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मनाई करण्यात येत आहे.	१.नेहरुनगर कडुन येणारी सर्व प्रकारचे वाहने महात्मा फुले स्मारकापासुन डाव्या बाजुने आलम गॅरेज पासुन इच्छित स्थळी जातील.
	४.चिंचवड कडुन महावीर चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मनाई करण्यात येत आहे.	१.चिंचवड कडुन येणारी वाहतूक डाव्या बाजुने लोकमान्य हॉस्पिटल मार्गे इच्छित स्थळी जातील
	५.बसवेश्वर चौकाकडुन महावीर चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मनाई करण्यात येत आहे	१.केएसबी चौकाकडुन येणारी वाहतूक बस्वेश्वर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

वरील नमुद मार्गावर दिनांक २६/११/२०२६ रोजी पहाटे ०४/०० वा पासुन सकाळी १०/०० वाजेदरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतुकीस (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) आवश्यकतेनुसार मनाई करणेकरीता अधिसुचना (नोटिफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

तरी वाहन चालकांनी/नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा.

(विक्रांत देशमुख)
पोलीस उपायुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड शहर
२) मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड

Scanned with OKEN Scanner

३) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४)प्रभारी अधिकारी **पिंपरी**, वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड

/- वाहतुक बदलाचे अनुषंगाने योग्य ते बॅरीगेटींग लावून बंदोबस्त नेमावा.

Scanned with OKEN Scanner